**फौ.कि.अर्ज क्र. १५/२०२१**

**निशाणी क्र.२९ लगत.**

मी वेदीका निलेश पाटील, वय– ३५ वर्षे, व्यवसाय– घरकाम, रा. धमाणे, ता. शिंदखेडा जि. धुळे शपथेवर कथन करते की,

**<u>अर्जदार हिचा उलटतपास जाबदेणार तर्फे विधीज्ञ श्री. जे. पी. कुवर यांचे मार्फत शपथेवर सुरु</u>**

१०. हे म्हणणे खरे आहे की, जिल्हा न्यायालय, शहादा यांचेकडील दिवाणी अपील क्र. ४६/२०२२ चे कामी क्रुरतेच्या मुद्द्यावर फारकीचा निर्णय हा माझ्या पतीच्या बाजुने लागलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, जिल्हा न्यायालय, शहादा यांचेकडे अपील करण्यापुर्वी दिवाणी न्यायाधीश व. स्तर, शहादा यांचेकडील एच.एम.पी. २/२०२० चे प्रकरणी माझेमध्ये व माझे पतीमध्ये ५०००/– रुपये दरमहा पोटगी समझोता झाला होता व त्याप्रमाणे पुरशीस देण्यात आली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर प्रकरण चालु असतांना माझ्या नवऱ्याने मला दरमहा ५०००/– रुपये नियमितपणे दिले. माझे शिक्षण एम. ए. पर्यंत परंतु पुर्ण न झालेले आहे.

**प्रश्नः** शहादा येथील २/२०२० हया एच.एम.पी प्रकरणामध्ये तुम्ही तुमचे शिक्षण एम. एस्सी. बी. एड असल्याबाबत उलटतपासादरम्यान कबुली दिली होती ?

**उत्तरः** मी बोलत असतांना मला थांबवण्यात आले हात दाखवुन व टाईप करुन घेण्यात आले.

हे म्हणणे खरे आहे की, साहेबांनी चुकीचे टाईप करुन घेतले आहे असे माझे म्हणणे आहे. मी एम. ए. बी. एड असल्याबाबत आजपावेतो खुलासा केलेला नाही. (आता साक्षीदारास नि. क्र. ७ कडील मालमत्ता व दायित्व शपथपत्र दाखविण्यात आले. )

**प्रश्नः** सदर नि. क्र. ७ कडील मालमत्ता व दायित्व शपथपत्रातील पात्रता या सदरा खाली तिचे शिक्षण एम. ए. बी. एड दर्शविलेली आहे हे म्हणणे

खरे आहे की,

**उत्तर:** मला आता एवढया दिवसांनी लक्षात नाही.

नि. क्र. ७ कडील मालमत्ता व दायित्व शपथपत्र माझ्या सांगण्याप्रमाणे तयार करण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की, शहादा येथील प्रकरणामध्ये मला पोटगी मिळत असलेबाबतची बाब मी नि. क्र. ७ कडील शपथपत्रामध्ये लपवुन ठेवलेली आहे.

११. मी दि. ०५.०६.२०२१ रोजी माझ्या माहेरी आलेली आहे. शहादा येथील एच. एम. पी. क्र. २/२०२० ही मी सासरी असतांनाच दाखल केली होती असे माझे म्हणणे नाही. हे म्हणणे खरे आहे की, शहादा येथील न्यायालयात प्रकरण चालु होण्यापुर्वी माझ्या पतीने मला वकीलांमार्फत दि. ०६.११.२०१९ रोजी नोटीस पाठविली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर नोटीसीच्या पुर्वीपासुनच मी माझ्या माहेरी व माझे पती त्यांच्या घरी असे राहत होतो. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०६.११.२०१९ पुर्वी माझ्या व माझ्या पतीच्या वादाबाबत नातेवाईकांच्या बैठकी बसल्या होत्या.

**प्रश्न:** तुम्हाला असे म्हणाचे आहे का आजपावेतो तुम्हा पती पत्नीच्या नातेवाईकांमध्ये तुमच्या वादाबाबत बैठकी झाल्या नाहीत ?

**उत्तर:** बैठकी झाल्या परंतु त्या शहादयाला झाल्या.

हे म्हणणे खरे आहे की, आमचे लग्न हे राजेंद्र भिमराव बाविस्कर आणि हिम्मतराव प्रतापराव बोरसे यांच्या मध्यस्थीने जमले. हे म्हणणे खरे आहे की, नातेवाईकांमध्ये बैठकी झाल्या तेव्हा राजेंद्र भिमराव बाविस्कर आणि हिम्मतराव प्रतापराव बोरसे हे उपस्थित होते. त्या दोघांशिवाय आणखीन रतीलाल ओंकार, अमोल युवराज पाटील, नवनीत पाटील, माझे वडिल आणि काका असे हजर होते. हे म्हणणे खरे आहे की, शहादा येथील आमच्या प्रकरणामध्ये राजेंद्र भिमराव बाविस्कर याने साक्षीदार म्हणुन साक्ष दिली होती.

१२. हे म्हणणे खरे आहे की, माझे लग्न माझ्या मर्जीने झालेले आहे. माझे लग्न जुळण्यापुर्वी माझी एक बहिण लग्नाची होती व भाऊ मतीमंद होता. हे म्हणणे खरे आहे की,

लग्न ठरतेवेळी माझ्या बहिणीची व भावाची जबाबदारी माझा पती निलेश याने बघायची असे ठरले होते. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या लग्नाचा सर्व खर्च ठरल्याप्रमाणे माझ्या पतीने केला होता. हे म्हणणे खरे नाही की, लग्नाच्या खर्चाला म्हणुन मला राजु बाविस्कर याच्यासमोर एक लाख रुपये देखील दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, लग्न ठरल्यापासुन माझ्या नवऱ्याचे एटीएम कार्ड मीच वापरत होते. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या फारकतीच्या प्रकरणामध्ये माझ्या नवऱ्याचा छळ, पहिल्या बायकोची कु. धनश्री हिचा छळ व सासु सासऱ्यांचा छळ हे सर्व क्रुरतेचे मुद्दे होते.

१३. सासरी असतांना उपचाराकामी माझे पती मला डॉक्टरांकडे घेवुन गेले होते. मी स्वत:हुन सांगते की, मला मारहाण केली होती व त्यामुळे घेवुन गेले होते.

**प्रश्न:** सासरी असतांना तुम्ही मारहाण केल्याबद्दल कोणतीहही तक्रार पोलीस स्टेशन येथे केली होती का ?

**उत्तर:** मी पोलीस स्टेशन येथे तक्रार केली होती परंतु मला पोलीसांनी समजावुन सांगुन परत पाठवुन दिली.

**प्रश्न:** तक्रार लेखी होती का ?

**उत्तर:** तक्रार केली होती परंतु मला समजुत घालुन पाठवुन दिले.

मला समजावुन परत पाठविल्याची तारीख दि. १३.११.२०१९ अशी होती. दि. १३.११.२०१९ रोजी माझे वास्तव्य हे धमाणे येथे होते. मी दि. २०.०३.२०१९ पासुन धमाणे येथे राहत होते.

**प्रश्न:** तुम्ही २०१९ हया वर्षामध्ये महिला दक्षता समिती कडे तक्रार दाखल केली होती का ?

**उत्तर:** मी एस. पी. ऑफीस येथे तक्रार दाखल करण्याकरीता गेले होते परंतु त्यांनी माझी तक्रार न घेता समजावुन सांगुन परत पाठविले.

हे म्हणणे खरे नाही की, मी शहादा अथवा नंदुरबार येथे आजपोवतो माझे पती अथवा

त्याच्या नातेवाईकांविरुध्द पोलीस स्टेशन येथे कोणतीही तक्रार दाखल केलेली नाही.

१४. मी सन २०१९ मध्ये धमाणे येथे माहेरी आल्यानंतर दोंडाईचा पोलीस स्टेशन येथे तक्रार केली होती. मी सन २०१९ मध्ये धुळे येथे तक्रार केली नव्हती.

**प्रश्नः** तुम्ही दोंडाईचा पोलीस स्टेशन येथे दिलेली तक्रार दाखल करु शकाल का ?

**उत्तरः** मी तक्रार देण्याकरीता गेले होते परंतु त्यांनी माझी तक्रार न घेता समजावुन सांगुन परत पाठविले.

मी सन २०२० मध्ये दोंडाईचा पोलीस स्टेशन येथे माझे पती व त्याचे नातेवाईकांविरुध्द तक्रार दाखल केलेली नाही.

**प्रश्नः** तुम्हाला कुठल्या तारखेला महिला दक्षता समिती यांच्याकडे तक्रार दयावी असे वाटले ?

**उत्तरः** दि. ०५.०६.२०२१ रोजी त्यांनी मला मारहाण केली हाकलुन दिले त्यादिवशी मला तक्रार दयावी असे वाटले.

**प्रश्नः** दि. ०५.०६.२०२१ रोजी तुम्हाला शहादा येथे जाण्यापेक्षा धुळे येथे जाणे बरे वाटते का हे म्हणणे खरे आहे की,

**उत्तरः** त्यांच्या गाडया आमच्या मागे असायचे. ते आम्हाला जावु देत नसे.

१५. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सरतपासाच्या शपथपत्रातील परिच्छेद क्र. ८ मधील दस्तऐवज क्र. १ ते २७ म्हणजेच अनुक्रमे नि. क्र. ३० ते ५७ हे मी सेतु येथे जावुन काढुन आणली.

**प्रश्नः** तुम्ही सदर नमुद मिळकतींबाबत ड पत्रक दाखल करायला तयार आहात का ?

**उत्तरः** मला ड पत्रक म्हणजे काय हे माहित नाही.

हे म्हणणे खरे नाही की, सेतु वरती मी माहिती असलेली नावे निलेश पाटील, गोविंद पाटील, प्रकाश पाटील, उषा पाटील अशी साम्य असलेली नावे टाकली व ते उतारे काढुन घेतले. अर्जिंक्य मनोज दोडवे कोण आहे ते मला माहित नाही. माहेरी धमाणे येथे आल्यानंतर माझे पिंपळगाव, ता. भडगांव, जि. जळगाव येथे जाणे झाले असे घडले नाही. धमाणे येथे माहेरी आल्यानंतर माझे तलाठी शहादा यांचेकडे जाणे झाले होते. तलाठी शहादा यांनी मला कागद दिले असे झाले होते. त्यांनी मला त्यांच्या सहीनिशी कागद दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, पाटील समाजामध्ये निलेश प्रकाश पाटील अशी खुप लोकांची नावे आहेत. प्रकरणातील नमुद मिळकती हया जाबदेणार निलेश प्रकाश पाटील याच्याच आहेत किंवा कसे हे दाखविण्याकरीता मी तलाठी शहादा यांना साक्षीदार म्हणुन तपासणार आहेत किंवा कसे हे सांगता येणार नाही. इतर जाबदेणार म्हणजेच प्रकाश पाटील, उषाबाई पाटील यांच्या अनुषंगे मी तलाठी शहादा यांना तपासणार आहे किंवा कसे हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सेतुवरुन ऑनलाईन काढलेले कागद ज्या मिळकतीचे आहेत त्या मिळकतींचे मालक कोण आहेत हे मला माहित नाही.

१६. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या माहेरी असतांनाचा माझा गर्भपात झाला. डॉ. टोणगावकर यांच्या हॉस्पिटलमध्ये गर्भपात झाला नाही असे माझे म्हणणे नाही. हे म्हणणे खरे नाही की, गर्भपात झाला तेव्हा माझी आई, बहिण व वडिल हे माझ्यासोबत होते. हे म्हणणे खरे नाही की, मला कोणतीही शारीरिक व्याधी नसतांना मी माझ्या पतीला शहादा, धुळे व मुंबई येथे डॉक्टरांकडे घेवुन जायला भाग पाडत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझा कोणताही कौटुंबिक जाच झालेला नसतांना मी विलंबाने प्रस्तुतचे प्रकरण दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला केवळ माझ्या नवऱ्याला छळायचे असल्याकारणाने मी प्रस्तुतचे प्रकरण दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माहेरी धमाणे येथे आल्यापासुन आजपावेतो कधीही मला नांदावयाचे असल्याबाबत नोटीस दिली नव्हती अथवा दावा दाखल केला नव्हता. मी स्वत:हुन सांगते की, मी त्याबाबत नोटीस दिली होती. मी माहेरी आल्यापासुन आजपावेतो नवऱ्याने मला नांदावयाचे याकरीता केस केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझा पती फारकतीचा हुकूमनाला झाला

त्याप्रकरणामध्ये दरमहा दहा हजार रुपये देतो आहे. माझया सरतपासाच्या शपथपत्रातील परिच्छेद क्र. ७ मधील मजकुर दरमहा ७०,००० पेन्शन, प्लॉट्स, डंपर बाबत मी वेळ मिळाल्यास कागदपत्रे दाखल करेन. हे म्हणणे खरे नाही की, मी उच्चशिक्षीत असल्याने मी उत्तमपणे माझे उदरभरण करण्यास सक्षम आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या नवऱ्याचा छळ केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे. मी महिला संरक्षण अधिकारी यांचेकडे गेले होते. परंतु त्यांनी लक्ष दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी छळ केलेला असल्यामुळे मी वरिल सर्व सरकारी अधिकाऱ्यांविरुध्द खोटे आरोप करीत आहे.

**प्रश्न:** तुम्ही नांदविण्याबाबत पाठविलेली नोटीस न्यायालयात दाखल करणार आहात का ?

**उत्तर:** ती नोटीस शहादयात आहे.

जी नोटीस शहादयात आहे त्याची प्रत माझ्याकडे आहे. मी सदर प्रत न्यायालयात दाखल करणार आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

ADITYA GHANSHAM NAIK

Digitally signed by ADITYA GHANSHAM NAIK
Date: 2025.07.25 17:52:53 +0530

स्थळ : दोंडाईचा,
दिनांक : २५/०७/२०२५

(आदित्य घ. नाईक)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, दोंडाईचा

**प्रमाणपत्र**

मी, खात्रीपूर्वक कथन करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील आदेशाचा/न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ आदेशाप्रमाणे/न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – | श्री. गणेश साईनाथ अहिरे, |
| न्यायालयाचे नांव | – | दिवाणी व फौजदारी न्यायालय, दोंडाईचा. |
| दिनांक | – | २५/०७/२०२५. |

सही/–
लघुलेखक(श्रेणी–३)